# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२१३
फॅक्स ०२०-२५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे – ४११ ००७
email : st-arts@pun.unipune.ac.in

---

संदर्भ : परीक्षा/ बी.ए./ 667 दि. २७.०६.२०१७

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला महाविद्यालये
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

विषय : बी.ए. एप्रिल/मे, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या गुणपत्रके व पासिंग सर्टिफिकेट वितरणाबाबत

महोदय/महोदया,

एप्रिल/मे, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या बी.ए. (२००८ व २०१३ पॅटर्न) परीक्षेचा निकाल अनुक्रमे दिनांक १६.०६.२०१७ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. परीक्षेची गुणपत्रके व पासिंग सर्टिफिकेट खालीलप्रमाणे वितरित करण्यात येत आहेत.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी बुधवार, दिनांक २८.०६.२०१७ रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेवून जायची आहेत.
२. नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून बुधवार, दिनांक २८.०६.२०१७ रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.
३. अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून बुधवार, दिनांक २८.०६.२०१७ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.
४. अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहाता, कोपरगाव आणि संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संगमनेर नगरपालिका आर्टस डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर येथून बुधवार, दिनांक २८.०६.२०१७ रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखादया विद्यार्थ्याच्या गुणपत्रकाबाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील तांत्रिकता तपासून त्याबाबतची कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे.

आपला,

उपकुलसचिव,
(परीक्षा)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.
२. मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिका आर्टस, डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.